Vol 3 Issue 10 Nov 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

### *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

### *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-10, Nov-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# *भारतीय रूपयाचा मुल्य-हास आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम : एक अभ्यास*

**बी.डी.खंदारे**
प्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि.जालना

***सारांश :*** अलिकडील काळातील भारतीय रुपयाचा सतत होत असलेला मुल्य-हास ही चिंतेची बाब बनली आहे. अर्थशास्त्रीय दृष्टीकोणातून चलनाचे अवमुल्यन व मुल्य-हास वेगवेगळया संकल्पना आहेत. अवमुल्यन स्थिर विनियम दर अस्तित्वात असतांना सरकारकडून उपयोगाला आणलेले पाऊल आहे. तर चलनाचा मुल्य-हास बाजारी विनिमय दर अस्तित्वात असतांना चलनाच्या मागणी व पुरवठयातील घडोमोडीमुळे निर्माण झालेली अवस्था होय. भारतीय रूपयाचा इतर देशाच्या चलनाशी असलेला विनिमय दर सध्या बाजारातील चलनाच्या मागणी–पुरवठयावरून निश्चित होतो. आंतरराष्ट्रीय चलन बाजाराला अमेरिकन डॉलरची सतत वाढणारी मागणी. तुलनेत रूपयाला विदेशातून होणारी कमी मागणी रूपयाच्या मुल्य-हासाला जबाबदार आहे. भारतीय रूपया व अमेरिकन डॉलर यांच्यातील विनिमय दर सप्टेंबर 2013 मध्ये सरासरी एक डॉलरला 63.89 रूपये राहीला. भारतीया रूपयाचा होणारा मुल्य-हास भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा महत्वाचा घटक आहे. रूपयाचे अवमुल्यन किंवा मुल्य-हास दोन्ही घटकांचे अर्थव्यस्थेवर होणारे परिणाम सारखेच आहेत. रूपयाच्या मुल्य-हासामुळे एकीकडे देशांतर्गत भाववाढ होत आहे. तर दुसरीकड विदेशी व्यापारातील तुट काही प्रमाणाला कमी होत आहे. आयात महाग तर निर्यात स्वस्त झाल्यामुळे सप्टेंबर 2013 मध्ये आयातीला 18.1 टक्क्यांनी वाढ झाली. विदेशी व्यापारातील वित्तीय तुट कमी झाली. रूपयाच्या मुल्य-हासाचा विपरित परिणाम पेट्रोल–डिझेलची आयात महाग होण्यात झाला. त्याचप्रमाणे परकीय कर्जाचे ओझे वाढले. अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी विदेशी विनिमय दरावर भारतीय रिझर्व्ह बॅंकेने नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

### *1.0 प्रास्ताविक* (Introduction)

भारत हा विकसनशील अर्थव्यवस्था असलेला देश आहे. भारताची सर्वच क्षेत्रातील प्रगती गतीने होत आहे. विकसनशील देशातील विकास प्रक्रियेला भांडवलाची मोठी गरज असते. म्हणून प्रत्येक देश जास्तीत जास्त भांडवल बाजारात आणण्याचा प्रयत्न करतो. भारत विदेशी गुंतवणूक व व्यापाराच्या माध्यमातून भांडवल उभारण्याचा प्रयत्नशील आहे. भारताने आपल्या नियोजन काळात विदेशी व्यापाराचे धोरण 1991 पर्यंत नियंत्रीत स्वरूपाचे ठरविले. मात्र 1991 नंतरच्या काळाला जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण धोरणाचा स्विकार करून मुक्त आर्थिक व्यापाराकडे वाटचाल सुरू केली. याचाच एक परिणाम म्हणून भारत सरकारने नियंत्रित चलन विनिमय दर निश्चितीची पध्दत बंद करून 1993 पासून चलनाचा मुक्त (बाजारी) विनिमय दर (Floating Exchange Rate) सुरू केला. भारतीय रूपयाचा जगातील इतर देशाच्या चलनाशी होणारा विनिमय चलनाच्या बाजारातील मागणी–पुरवठयावरून निश्चित होउ लागला आहे. त्यामुळे रूपयाचा इतर देशाच्या चलनाशी होणारा विनिमय दर दररोज बदलत राहीला. भारताने तरती विनिमय दर पध्दती स्विकारली. विनिमय दरातील बदलाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर सातत्याने होत असल्यामुळे विदेशी व्यापार, कर्ज, विदेशी पर्यटन, विदेशी व्यापारी तुट, देशांतर्गत भाववाढ इत्यादी बाबी प्रभावीत झाल्या. आज अमेरिकेला डॉलर हे जगातील सर्वमान्य चलन आहे. भारतीय रूपयाचा अमेरिकन डॉलरशी असलेली विनिमय 2012–13 व 2013–14 या आर्थिक वर्षात सतत बदलता दिसतो आहे. याचा परिणाम आयात–निर्यात मुल्य बदलात होत आहे. अलीकडच्या काळात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रूपयाचे मुल्य सतत घटतांना दिसते. भारतीय रूपयाचा सतत होणारा मुल्य-हास, अवमुल्यन व मुल्य-हास संकल्पना, मुल्य-हासाची कारणे, परिणाम, मुल्य-हास रोखण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना इत्यादी बाबींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

### *2.0 संशोधनाची उद्दिष्टये व संषोधन पध्दती* (Objectives and Research Methodology) *प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील महत्वाची उद्दिष्टये विचाराला घेतली आहेत.*

1.विदेशी विनिमय चलन व्यवहारातील अवमुल्यन व मुल्य-हास संकल्पना स्पष्ट करणे.
2.अमेरिकन डॉलरच्या तुलनेला भारतीय रूपयाच्या मुल्य-हासाची कारणे शोधणे.
3.भारतीय रूपयाच्या मुल्य-हासाचा विदेशी व्यापारावर होणारा परिणाम अभ्यासणे.
4.विदेशी विनिमय बाजाराला भारतीय रूपयाचे मुल्य बळकट करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

### *3.0 संशोधन पध्दती :–*

उपरोक्त उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी योग्य संशोधन पध्दतीची आवश्यकता असते प्रस्तुत अभ्यास द्वितीय माहिती स्त्रोतावर आधारीत आहे. भारताची–सामाजिक आर्थिक पाहणी, आर.बी.आय. बुलेटीन, विदेशी व्यापाराशी संबंधीत विविध लेख, विविध ग्रंथ, वर्तमानपत्र, संशोधन अहवाल इत्यादी द्वितीय माहितीचा आधार घेतला आहे. अद्यावत विदेशी चलन विनिमय व्यवहार (विशेषतः USD व INR) अभ्यासण्यासाठी इंटरनेटचा वापर केला आहे. अमेरिकन डॉलर व भारतीय रूपयाचा विनिमय दर (मासिक सरासरी दर) मार्च–2011 ला सप्टेंबर 2013 पर्यंत विचारात घेतला आहे. मात्र केवळ सप्टेंबर 2013 मधील विनिमय दर पाहतांना दररोज होणारा बदल अभ्यासला आहे. टक्केवारी, सरासरी वार्षिक वृध्दी दर इत्यादी सांख्यिकीय साधनांचा उपयोग केला.

### *4.0 चलनाचे अवमुल्यन व मुल्य-हासः संकल्पना* (Objective and Depreciation : Concept)

चलनाचे अवमुल्यन व मुल्य-हास दोन्ही संकल्पना अवमुल्यन नावाने वापरात असल्या तरी अर्थशास्त्रीय दृष्टीकोणातून दोन्हीत मुलभूत स्वरूपाचा फरक आहे. दोन्ही संकल्पनाचा अर्थशास्त्रीय फरक विचारात घेणे महत्वाचे आहे.

#### *(अ) अवमुल्यन : अर्थ*

चलनाचे अवमुल्यन म्हणजे स्वदेशातील चलनाचे विदेशी चलनाच्या तुलनेत मुल्य घटविणे होय. ही मुल्य घट सरकार नियंत्रीत विदेशी विनिमय दर अस्तित्वात असतांनाच केलेली असते. चलनाचे अवमुल्यन करणे सरकारच्या निर्णय प्रक्रियेचा भाग असतो. स्थिर विनिमय दर पध्दतीत अवमुल्यन केले जाते. जेव्हा सरकार आपल्या चलनाचे मुल्य इतर चलनाच्या तुलनेत कमी करू इच्छितो तेव्हा त्या बदलाला अवमुल्यन असे म्हणतात.

#### *(ब) चलनाचा मुल्य-हास : अर्थ*

चलनाचा मुल्य-हास म्हणजे बाजाराधिष्ठीत (तरती) विनिमय दर पध्दती मध्ये स्वदेशी चलनाचे विदेशी चलनाच्या संदर्भाला मुल्य कमी होणे होय. तरता विनिमय दर म्हणजे जागतिक गुंतवणूक बाजाराद्वारे चलनांचे मुल्य निश्चित करणे होय. चलनाचा मुल्य-हास चलन बाजारातील चलनाच्या मागणी–पुरवठयावरून निश्चित होतो. विदेशी गुंतवणुकदाराकडून स्वदेशी चलनाची मागणी कमी होणे म्हणजेच मुल्य-हास सुरूवात होणे होय. चलनाचा मुल्य-हास शासन नियंत्रीत नसतो. परंतु देशातील सरकार किंवा केंद्रीय बॅंक चलनाचा मुल्य-हास रोखण्यासाठी बाजारावर प्रभाव पाडू शकतात.

2012 पर्यंत जगातील जवळपास सर्व देशांनी तरती विनिमय दर पध्दती स्विकारली आहे. मागील दोन वर्षापासून भारतीय रूपयाचे अमेरिकन

डॉलरशी असलेले विनिमय मुल्य सतत घटत आहे. म्हणजेच भारतीय रूपयाचा मुल्य‌र्‍हास होत आहे. 1991 नंतर भारताने रूपयाचे अवमुल्यन केलेले नाही. दोन्ही संकल्पनाला मुलभूत फरक असला तरी दोहोचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम सारखेच आहेत.

### *5.0 भारतीय रूपयाची मुल्य‌र्‍हास प्रवृती (*Trends on Indian Rupee Depreciation*) :*

1971 मध्ये विनिमय दरतील ब्रिटनवुड पध्दती संपुश्टात आली. 1971 ते 1975 या काळात भारतीय रूपया ब्रिटीश स्टर्लिंग पौंड नुसार निश्चित होत असे. 1975 ते 1990 पर्यंत विनिमय दर निश्चिती निवडक चलन गट (Basket of Currences) पध्दती नुसार ठरविण्यात येत होती. मार्च 1992 ते मार्च 1993 या काळात द्विदल विनिमय दर निश्चित पध्दती भारताने अंगीकारली. रूपया अंशतः परिवर्तनीय केला. भारतीय रिझर्व्ह बॅंक नियंत्रीत 40 टक्के विनिमय व 60 टक्के विनिमय दर निश्चिती बाजारी विनिमय पध्दतीनुसार ठरली. मात्र मार्च 1993 नंतर भारत सरकारकडून भारतीय रूपयाचा विनिमय दर पुर्णतः बाजारी पध्दतीने किंवा तरता विनिमय दर पध्दतीने ठरविण्यात येत आहे. बाजाराधिष्ठीत विनिमय दर पध्दतीत चलनाचा इतर चलनाशी असलेला दर दररोज बदलत राहतो.

***तक्ता क.1 : भारतीय रूपया व अमेरिकन डॉलर यांच्यातील मासिक सरासरी दर***
***(अमेरिकन एक डॉलरच्या तुलनेत रूपया)***

| महिना | मासिक सरासरी | विनिमय दर बदल % | मार्च ते मार्च बदल |
|---|---|---|---|
| मार्च 2011 | 44.86 | – | |
| एप्रिल 2011 | 44.29 | –1.27 | |
| मे 2011 | 44.83 | 1.21 | |
| जुन 2011 | 44.80 | 0.06 | |
| जुलै 2011 | 44.34 | –1.02 | |
| ऑगस्ट 2011 | 45.32 | 2.21 | |
| सप्टेंबर 2011 | 47.52 | 4.85 | |
| ऑक्टोंबर 2011 | 49.19 | 3.51 | |
| नोव्हेंबर 2011 | 50.67 | 3.00 | |
| डिसेंबर 2011 | 52.34 | 3.29 | |
| जानेवारी 2012 | 51.13 | –2.31 | |
| फेब्रुवारी 2012 | 49.11 | –3.95 | |
| मार्च 2012 | 50.31 | 2.44 | 12.14 |
| एप्रिल 2012 | 51.69 | 2.74 | |
| मे 2012 | 54.36 | 5.16 | |
| जुन 2012 | 55.89 | 2.81 | |
| जुलै 2012 | 55.37 | –0.93 | |
| ऑगस्ट 2012 | 55.52 | 0.27 | |
| सप्टेंबर 2012 | 54.42 | –1.98 | |
| ऑक्टोबर 2012 | 53.06 | –2.49 | |
| नोव्हेंबर 2012 | 54.80 | 3.27 | |
| डिसेंबर 2012 | 54.61 | –0.34 | |
| जानेवारी 2013 | 54.26 | –0.64 | |
| फेब्रुवारी 2013 | 53.84 | –0.77 | |
| मार्च 2013 | 54.43 | 1.09 | 1.09 |
| एप्रिल 2013 | 54.35 | –0.14 | |
| मे 2013 | 54.97 | 1.14 | |
| जुन 2013 | 58.36 | 6.16 | |
| जुलै 2013 | 59.79 | 2.45 | |
| ऑगस्ट 2013 | 62.78 | 5.00 | |
| सप्टेंबर 2013 | 63.89 | 1.76 | मार्च 2011 ला सप्टेंबर 2013 (42.42) |

संदर्भ : http ://www.stockfry.com/forex-watch.asp.

### *6.0 भारतीय रूपयाच्या मुल्य‌र्‍हासाचा विदेषी व्यापारावरील परिणाम (*Impact of Indian Rupee Depreciation on Foreign Trade*) :*

भारतीय रूपयाच्या मुल्य‌र्‍हासामुळे विदेशी व्यापारावरील परिणाम अभ्यासतांना भारताच्या आयातीवरील परिणाम, निर्यातीवरील प्रभाव, व्यापारी तुटीवरील परिणाम, विदेशी कर्जावरील परिणामाचा अभ्यास करणे संयुक्तीक आहे.

#### *(अ) भारताच्या आयातीवरील परिणाम :–*

भारताच्या परकीय व्यापाराला आयात सर्वात महत्वाचा घटक आहे. रूपयाच्या मुल्य‌र्‍हासामुळे आयात वस्तुंची किंमत वाढते. उद्योगांना लागणारा विदेशी कच्चामाल महाग होतो. अमेरिकन डॉलर हे आंतरराष्ट्रीय चलन असल्यामुळे रूपयाच्या तुलनेत डॉलर व्यापारासाठी वापरला जातो. पुर्वीच्याच आयात वस्तुला असतांना सुध्दा मुल्य‌र्‍हासाचा परिणाम म्हणून जास्त रूपये मोजावे लागतात. आयात महाग झाल्यामुळे काही प्रमाणात आयात कमी होतो. भारताच्या आयातीला पेट्रोल–डिझेल तेल व सोने या दोहोचा मोठा वाटा आहे. पेट्रोलची आयात कमी न झाल्यास सरकारचा आयात खर्च वाढून व्यापारी तुट वाढत जाते. एप्रिल ते सप्टेंबर 2012 मध्ये एकूण आयात 236494 मिलीयन USD झाली. हीच आयात एप्रिल ते सप्टेंबर 2013 या कालावधीला 232232 मिलीयन ैन्क झाली. म्हणजेच आयातीला 1.80 टक्यांनी घट झाली. मुल्य‌र्‍हासामुळे आयात महाग झाली. सप्टेंबर 2012 च्या तुलनेत सप्टेंबर 2013 मध्ये आयातीत 18 टक्यांनी घट झाली.

#### *(ब) भारताच्या निर्यातीवर परिणाम :–*

रूपयाच्या मुल्य‌र्‍हासामुळे विदेशातील लोकांना आपल्या वस्तु स्वस्त होतात. विदेशातुन भारतीय मालाला मागणी वाढते. एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीचा विचार करता 2012–13 मध्ये एकूण निर्यात 144674 मिलीयन अमेरिकन डॉलर होती. हीच निर्यात उपरोक्त कालावधीत 2013–14 मध्ये 54.35 रूपयाला 1 अमेरिकन डॉलर होता. तो सप्टेंबर 2013 मध्ये 63.89 रूपयाला झाला. म्हणजेच रूपयाचा मुल्य‌र्‍हास निर्यात वाढीस कारणीभूत ठरला असे म्हणता येईल. सप्टेंबर 2012 च्या तुलनेत सप्टेंबर 2013 मध्ये निर्यात जवळपास 12 टक्यांनी वाढली.

#### *(क) भारताची परकीय व्यापार तुट :–*

विदेशी व्यापाराला आयातीपेक्षा निर्यात कमी असेल तेव्हा व्यापारात तुट निर्माण होते. परंतु ही व्यापारातील तुट चलनाच्या मुल्य‌र्‍हासामुळे कमी होउ शकते. भारताच्या विदेशी व्यापाराचा अभ्यास विचारात घेतल्यास असे दिसते की, एप्रिल ते सप्टेंबर 2013 मध्ये व्यापारातील तुट 80126.24 मिलीयन USD दिसून आली. याच कालावधीत 2012 मध्ये ही तुट 91820 मिलीयन ैन्क होती. म्हणजेच परकीय व्यापारातील तुट रूपयाच्या मुल्य‌र्‍हासामुळे 12.73 टक्के कमी झाली.

#### *(ड) विदेशी कर्जावरील परिणाम :–*

भारताच्या रूपयाचा अमेरिकन डॉलरच्या तुलनेत झालेल्या मुल्य‌र्‍हास विदेशी कर्जाचा भार वाढविणारा ठरला. परकीय कर्ज मुल्य‌र्‍हासामुळे महाग होते. विदेशी चलनात कर्जाची परतफेड करावी लागत असल्यामुळे व विदेशी चलन महाग झाल्यामुळे कर्जाचे ओझे वाढले. मात्र परकीय चलनाला देय विदेशी कर्ज सरकारच्या एकूण कर्जाच्या केवळ 6 टक्के असल्यामुळे ओझे थोडे कमी झाले. भांडवलदारांना परकीय चलनात देय असलेल्या कर्जाचा खर्च वाढतो.

सारांश, भारतीय रूपयाच्या मुल्य‌र्‍हासाचा परिणाम विदेशी व्यापारावर संमिश्र स्वरूपाचा दिसून आला. निर्यातीसाठी अनुकूल तर आयातीसाठी प्रतिकूल परिणाम झालेला दिसतो. अलवचिक वस्तुंची आयात जास्त असल्यामुळे (पेट्रोल–डिझेल, उद्योगाचा कच्चामाल इत्यादी) आयात खर्च वाढतांना दिसतो.

### *7.0 भारतीय रूपया मजबुतीसाठी उपाययोजना (*Remedies for Strengths of Indian Rupee*):*

भारतीय रूपयाच्या मुल्य‌र्‍हासामुळे आयात महाग झाली. पेट्रोल–डिझेलची (आयात महाग असतांना सुध्दा) आयात आवश्यक आहे. याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहे. आवश्यक वस्तुंना दिली जाणारी अनुदाने वाढत जाउन चालू खात्यातील तुट चिंताजनक परिस्थितीत म्हणजे एकूण स्थूल उत्पादनाच्या (GDP) 4.8 टक्क्यांपर्यंत गेली. घसरणाऱ्या रूपयाला सावरण्यासाठी सरकारी स्तरावरून तसेच भारतीय रिझर्व्ह बॅंकेकडून प्रयत्न केले जात आहेत. रूपयाच्या मुल्य‌र्‍हासाचा परिणाम देशांतर्गत भाववाढ होण्यास मदत करतो परंतु त्याच बरोबर अर्थव्यवस्थेचे अंदाजपत्रक कोलमंडते, रूपयाला मजबुती प्राप्त करून देणारी चलन बाजार यंत्रणा सक्षमपणे उभी करणे आवश्यक आहे. त्यासाठी काही उपाययोजनांचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

i विदेशी परकीय गुंतवणुकदारांना आकर्षीत करणाऱ्या प्रभावी उपाययोजना राबवाव्या, परकीय चलनाचा पुरवठा वाढवून रूपया मजबुत होईल.

ii रूपयाच्या मुल्य घसरणीचा अर्थव्यवस्थेने लाभ उचलावा. निर्यात जास्तीत जास्त वाढवून आयात कमी करावी. याचा परिणाम वित्तीय तुट कमी होउन रूपयाला आर्थिक पाठबळ मिळेल.

iii भारतीय रूपयाचे अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करावे. परकीय व्यापार करतांना चीन, जपान, रशिया, ब्राझील, द. अफ्रिका त्या त्या देशाच्या चलनाला प्राधान्य द्यावे. त्यामुळे अमेरिकेतील आर्थिक घडामोडीचा रूपयावरील प्रभाव कमी होईल.

iv भारताला सुवर्णाची होणारी आयात कमी व्हावी म्हणून शासन प्रयत्न करीत आहे. विदेशी व्यापारात तुट निर्माण होण्यास सुवर्ण आयात महत्वाचा जबाबदार घटक आहे. सुवर्ण आयातीसाठी अमेरिकन डॉलरची मागणी वाढते. रूपयाची विक्री होउन मुल्य-ऱ्हास होतो. सुवर्ण आयात शुल्कात वाढ करावी.

v स्वदेशी पर्यटन विकासाला चालना द्यावी. विदेशातील पर्यटक आपल्या देशात येण्यासाठी शासकीय व खाजगी पातळीवर पर्यटन केंद्रे विकसित करावित.

vi रूपयाच्या मुल्य-ऱ्हासाचा अनुकूल परिणाम स्वदेशी वस्तु मागणीच्या वाढीत होतो. स्वदेशी वस्तु स्वस्त तर विदेशी वस्तु महाग होतात. स्वदेशी बाजारपेठेला स्वदेशी वस्तुंचा हिस्सा वाढवावा. स्वदेशी वस्तुंची मागणी अर्थव्यवस्थेला तेजीच्या स्थितीकडे नेईल व त्यातूनच रूपया मजबुत होउ शकेल.

vii निर्यात वृध्दी कमी व आयात वृध्दी जास्त अशा व्यापार तुट निर्मितीमुळे रूपयाच्या मुल्यावर परिणाम होतो. निर्यात वृध्दी परकीय चलनाचा साठा वाढवितो तर आयात वृध्दी परकीय चलनाचा साठा घटवितो. रूपयाच्या विनिमय व्यवहारातील मजबुतीसाठी निर्यातक्षम उद्योग निर्मितीचे स्वदेशी गुंतवणूक धोरण राबवावे.

एकंदरीत भारतीय रूपयाची अमेरिकन डॉलरच्या तुलनेत झालेली मुल्य घसरण एक बाजारी स्वरूपाची घटना आहे. विदेशी चलन विनिमय बाजार आज पुर्णतः परिवर्तनीय असल्यामुळे अर्थव्यवस्थेची मजबुतीच भारतीय रूपयाला मुल्य प्राप्त करून देईल यात शंका नाही.

***संदर्भ :–***

1.Agrawal Amol (2011), Rupee Depreciation, Probable Causes and outlook STCI Primary Dearler Ltd, 21 Dec. 2011.

2.Ajeet kumar and Reema Sharma (2013), Rupee Downslide; How it will impact you, Z Business. Com, Aug.28, 2013.

3.Bhole L.M. (1985), Impacts of monetary policy, Himalaya Publishing House, New Delhi.

4.Daily Jang News (2008), Currency Devaluation and its Impact on the Economy, Business and Finance Review, April 21, 2008.

5.Jain Priyamvada (2013), Rupee Depreciation-Causes and Effects. The Indian Economist, Latest Edition, Aug 10, 2013.

6.Saket Nikhil (2013), Rupee Depreciation and its Impact on the Economy, Article, www.indiastat.com, Sep-Oct, 2013.

7.Singh Kavaljit (2013), collapsing Asian currencies? Why is the Indian Rupee Depreciating? Global Research, global research.org. Sep. 16, 2013.

8.Rangarajan C. (2011), Rupee Depreciation will have Impact on Imports. The Hindu (Business), Nov.29, 2011

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- ✶Google Scholar
- ✶EBSCO
- ✶DOAJ
- ✶Index Copernicus
- ✶Publication Index
- ✶Academic Journal Database
- ✶Contemporary Research Index
- ✶Academic Paper Databse
- ✶Digital Journals Database
- ✶Current Index to Scholarly Journals
- ✶Elite Scientific Journal Archive
- ✶Directory Of Academic Resources
- ✶Scholar Journal Index
- ✶Recent Science Index
- ✶Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net